Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 12 February 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १२ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्सच्या दौऱ्यावर असून, ते मार्सेली इथं पोहोचले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात या ठिकाणाचं मोठं महत्व आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर इथल्याच समुद्रकिनाऱ्याजवळ जहाजातून उडी मारुन मार्सेली बंदरावर पोहोचले होते. त्यावेळी त्यांना पाठिंबा देणाऱ्या आणि ब्रिटिशांच्या ताब्यात देण्याला विरोध करणाऱ्या फ्रेंच कार्यकर्त्यांचे आणि जनतेचे आपल्याला आभार मानायचे असल्याचं, पंतप्रधान मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यात आज माघ पोर्णिमा स्नान सुरु आहे. यावर्षी दहा लाखाहून अधिक कल्पवासी भाविक यामध्ये सहभागी होत आहेत. उत्तर प्रदेश सरकारनं विशेष वाहतूक व्यवस्थेसह कडक सुरक्षा व्यवस्था तयार केली आहे. १३ जानेवारी रोजी महाकुंभमेळ्याला सुरुवात झाल्यापासून आतापर्यंत ४६ कोटींहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

देशाच्या प्रत्यक्ष कर संकलनात गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत १४ पूर्णांक ६९ शतांश टक्क्याची वाढ झाल्याची माहिती केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने दिली आहे. चालू आर्थिक वर्षात १७ लाख ७८ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रत्यक्ष कर संकलित झाला आहे. वैयक्तिक प्राप्तीकर संकलनातही नऊ लाख ४७ हजार कोटी रुपयांची वाढ झाली असून, सात लाख ७८ हजार कोटी रुपये भांडवली कर जमा झाला आहे.

****

लॅम रिसर्च की कंपनी भारतात दहा हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करणार असल्याची माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी

दिली. भारताच्या सेमीकंडक्टर निर्मिती प्रवासातला हा आणखी एक महत्वाचा प्रकल्प असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. देशाच्या सेमीकंडक्टर अभियानाचा एक भाग म्हणून या उद्योगात गुंतवणुकीला प्रोत्साहन दिलं जात आहे.

****

माहिती आणि तंत्रज्ञान विषयक विविध समस्यांवर उपाय सुचवण्यासाठी महा हॅकेथॉन चॅलेंज या स्पर्धेचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल उद्घाटन करण्यात आलं. तंत्रज्ञान नवोन्मेषक, संशोधक, उद्योजक, स्टार्टअप यांच्यासाठी ही स्पर्धा असून, विविध समस्यांवर प्रभावी आणि स्वदेशी उपाय उपलब्ध व्हावेत या उद्देशाने स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

****

येत्या आर्थिक वर्षापासून दिव्यांग व्यक्तींच्या कल्याण आणि सक्षमीकरणाकरता जिल्हा वार्षिक योजनेतून एक टक्का निधी राखीव ठेवण्याचे आदेश, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. यासंदर्भातला शासन आदेशही जारी झाला आहे. या निधीच्या योग्य विनियोग होण्यासाठी सुस्पष्ट आदेश लवकरच नियोजन विभाग, वित्त विभागाच्या मान्यतेने दिव्यांग कल्याण विभाग जारी करेल, असंही त्यांनी सांगितलं.

****

राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या आणखी एका रुग्णाचा काल मृत्यू झाला. पुणे महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात एका ३७ वर्षीय रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे. राज्यात या आजाराने आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला असून, जीबीएस रुग्णांची एकूण संख्या १९२ झाली आहे.

****

राज्याचा माहिती तंत्रज्ञान विभाग आणि राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राच्या वतीने काल सुरक्षित इंटरनेट दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने राज्यभर जनजागृती मोहीम राबवण्यात आली. इंटरनेटचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर करण्याबाबत जागरूकता वाढवणं हा या मोहिमेचा उद्देश आहे.

****

गडचिरोली जिल्ह्यात काल नक्षलवाद्यांशी झालेल्या चकमकीत एका सैनिकाला वीरमरण आलं. भामरागड तालुक्यातल्या दिरंगी आणि फुलणार गावांच्या जंगलात सुरक्षा दलांनी सुरु केलेल्या नक्षलविरोधी अभियानादरम्यान ही चकमक झाली. पोलिसांनी नक्षलवाद्यांचा तळ उद्‌ध्वस्त केला असून, साहित्य ताब्यात घेतलं आहे.

****

जालना जिल्ह्यातल्या महाकाळा इथं पोलिसांनी काल सुमारे नऊ लाख रुपये किमतीचा ३० किलो गांजा जप्त केला. गोंदी पोलिसांनी केलेल्या या कारवाईत चार संशयितांविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

नाशिक महापालिका क्षेत्रात असलेल्या सातपूर आणि अंबड औद्योगिक वसाहतीत उद्योगांना सात वर्षांपूर्वी करण्यात आलेली ११ पट करवाढ रद्द करण्यात आली आहे. पूर्वीच्या दरानुसारच आता आकारणी करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने उद्योजकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

****

भारत आणि इंग्लंड संघात तिसरा आणि अंतिम एकदिवसीय क्रिकेट सामना आज अहमदाबाद इथं खेळला जाणार आहे. दुपारी दीड वाजता सामन्याला सुरुवात होईल. मालिकेत पहिले दोनही सामने जिंकून भारताने विजयी आघाडी घेतली आहे.

****

क्रिकेटपटू जसप्रित बुमराह पाठिच्या दुखापतीमुळे आयसीसी चॅम्पियन्स चषक स्पर्धा खेळू शकणार नाही. त्याच्या जागी हर्षित राणाचा संघात समावेश करण्यात आल्याचं भारतीय क्रिकेट नियामक मंडळ – बीसीसीआयनं सांगितलं. या स्पर्धेतला भारताचा पहिला सामना २० फेब्रुवारीला बांग्लादेश सोबत होणार आहे.

****

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई आणि विदर्भानं उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. कोलकाता इथं झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात, मुंबईनं हरयाणावर १५२ धावांनी विजय मिळवला, तर नागपुरात झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात, विदर्भानं तामीळनाडूवर १९८ धावांनी मात केली.

****